• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३३९ • सोमवार, दि. ११ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 339 • Monday 11 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3



सोमेश्वर मंदिरासमोर, बार्शी रोड, बीड

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

▪ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ▪




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# निवडणूक तोंडावर तरीही उमेदवारांबाबत दमछाक

**मुंबई । वृत्तसेवा**

निवडणूक विषयक आढावे घेऊन झालेत, तयारीही अंतिम टप्प्यावर आहे; पण महायुती व महाआघाडी अंतर्गत कोणती जागा कोणाला व उमेदवार कोण हेच समोर आलेले नसल्याने अनिश्चितता व संभ्रम टिकून आहे, जे उत्कंठावर्धकच ठरले आहे. लोकसभा निवडणुक आता अगदीच जवळ आली आहे, या दोन चार दिवसातच त्यासंबंधीची घोषणा होऊन आचारसंहिता जारी होण्याची शक्यता असल्याने राजकीय परिघावरील लगबग वाढली आहे; मात्र अजूनही विशेषता आपल्याकडील जागा महाआघाडी व महायुती अंतर्गत कोणाला सुटेल व तेथील उमेदवार कोण असेन याची स्पष्टता नसल्याने संभ्रम कायम आहे. राजकीय पडघम दिवसेंदिवस गडद होऊ लागले आहेत. स्थानिक पातळीवरील तयारीला तर वेग आला आहेच, शिवाय राष्ट्रीय नेत्यांचे आढावे व बैठकांनीही वातावरण ढवळून निघत आहे. धामधुम वाढली आहे, वाजंत्री वाजते आहे; पण (उमेद)वराचाच पत्ता नाही अशी स्थिती आहे. बरे, मोठ्या व तुल्यबळ म्हणविणाऱ्या पक्षांचेच जागावाटप व उमेदवार अजून समोर आलेले नसल्याने तुलनेने लहान पक्षांकडून अपेक्षा करण्यात अर्थ नाही. यात ऐन वेळच्या उमेदवाराला मोठ्या पक्षांचे पाठबळ खऱ्या अर्थाने कामी येईलच, परंतु तुलनेने मर्यादित बळ असणारे पक्ष व त्यांच्या उमेदवारांची दमछाक होणे निश्चित आहे. केंद्रीय गृहमंत्री व सत्ता पक्षातील मातब्बर नेते नुकतेच महाराष्ट्रात येऊन गेलेत. अकोल्यातही बैठक घेऊन त्यांनी सहा लोकसभा मतदारसंघांचा आढावा घेतला. बूथ स्तरावरील यंत्रणांना कामाला लागण्याच्या सूचना देतानाच महायुती अंतर्गत उमेदवार कोणत्याही पक्षाचा असो, तो भाजपाचा असल्याचे समजून काम करण्याचे निर्देश त्यांनी दिलेत. शाह यांचे अकोल्यात ठिकठिकाणी ज्या जल्लोषात स्वागत झाले ते पाहता पक्ष कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावून गेले. मात्र या दौऱ्यानंतरही कुठला उमेदवार कोण, याबाबत स्पष्टपणे सांगता येऊ नये अशी स्थिती खुद्द भाजपातच आहे. अर्थात हे केवळ भाजपातच आहे असे नाही, प्रतिस्पर्धी काँग्रेस महाआघाडीचेही उमेदवार वा जागावाटप अद्याप नक्की

**पुढील पेजवर**

## मतदारांनो कोण काय बोलतोय याकडे लक्ष ठेवा - ॲड.अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**



प्रत्येक नेता हा समाज कारणापेक्षा राजकारणात जास्त लक्ष घालत आहे. त्यामुळे एखाद्या समाजाच्या आंदोलनात देखील वाह्यात बडबड करून त्या समाजाला दुखवण्याचे काम अनेक नेते करत आहेत. समाज कोणताही असो राजकारणी यांनी त्यांचे प्रश्न विचारात घेतले पाहिजेत. मात्र सध्या हे घडत नसल्याची खंत जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित एम. देशमुख यांनी व्यक्त केली आहे. मतदार जागृतीसाठी अभियान राबवणार असल्याचे सांगत त्यांनी सर्व स्तरातील कार्यकर्त्यांना आपापल्या भागातील आणि जिल्ह्यातील नेते काय बोलतात? प्रत्यक्षात ते कसे वागतात? त्यांच्या तुमच्या विषयी काय भावना आहेत? तुमच्या मागण्यांची ते कशी खिल्ली उडवतात? शेवटी हात कसे जोडतात ? या सर्व गोष्टीकडे लक्ष देण्याचे आवाहन केले आहे. नजीकच्या काळात आपल्या सर्वांना मतदान करावयाचे आहे. त्यामुळे व्यक्तिगत पातळीवर मतदार म्हणून आपल्या कोणत्या प्रश्नाला कोणता नेता साथ देतो आणि कोणता नेता विरोध करतो, यापेक्षा कोण वेगळंच बरळतय, या बाबी प्रत्येक मतदाराने आपल्या डोक्यात साठवून ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक मतदाराने आपले प्रश्न सोडवण्यासाठी नेता येतो का? हे पाहिले पाहिजे. त्याचप्रमाणे मतदार आणि त्याचा समाज यांचे जे प्रश्न आहेत, ते सोडवण्यासाठी कोण कोण नेता काय काय बोलतो, हे पाहणे देखील तेवढेच आवश्यक आहे. प्रत्येकाच्या अडचणी वेगळ्या आहेत. पण राजकारण्यांना त्या कळून चुकत नाहीत. त्यामुळे अनेक राजकारणी बरळत असल्याचे दिसते. आपली भूमिका आपण आवश्य मांडावी. पण एखाद्या समाजाला कमी उल्लेखन्याचा प्रयत्न यातून होता कामा नये. मात्र याकडे जनतेचे

**पुढील पेजवर**

## लोकसभा निवडणुकीची १५ मार्चला घोषणा

**मुंबई । वृत्तसेवा**

केंद्रीय निवडणूक आयोगाचा दौरा झाल्यानंतर १५ मार्च रोजी लोकसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणा होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. आयोगाने बहुसंख्य राज्यांचा निवडणूकपूर्व आढावा घेतला आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने केंद्रीय निवडणूक आयुक्तांना जम्मू व काश्मीरमधील कायदा-सुव्यवस्थेसंदर्भात दोन दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीमध्ये संपूर्ण माहिती पुरवलेली आहे. गृह मंत्रालयाने दिलेल्या तपशिलाच्या आधारे केंद्रीय निवडणूक आयोग जम्मू व काश्मीर या दोन्ही विभागांचा आढावा घेईल. त्यामुळे आयोगाकडून लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने विधानसभा निवडणुकीचीही तयारी केली जात असल्याचे समजते. दोन्ही निवडणुका एकाचवेळी घेण्यासंदर्भात आयोगाने अजून निर्णय घेतलेला नाही.

## मराठवाड्यात पाण्याचे संकट

**जालना । वृत्तसेवा**

मराठवाड्यातील संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यात आतापासूनच उन्हाळ्याचे संकट जाणवू लागले आहे. संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यात पाणी टंचाईमुळे टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. संभाजीनगर जिल्ह्यात २७९ टँकरने संभाजीनगरमध्ये पाणीपुरवठा केला जात आहे. तसेच जिल्ह्यात ५२० विहिरी अधिग्रहण करण्यात आल्या



आहेत. सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन संभाजीनगरमध्ये १२६ गावे आणि २९ वाड्यांना १८९ टँकरने पाणीपुवठा केला जात आहे. जालना जिल्ह्यातील ७० गावे आणि २६ वाड्यांना १२९ टँकरने पाणीपुवठा करण्यात येत आहे. मराठवाड्यात आतापासूनच लोकांना पाण्याचे संकट पडले आहे. उन्हाळा अजून सुरू झाला नाही तोपर्यंत पाण्याची कमतरता भासू लागली आहे. यंदा संपूर्ण महाराष्ट्रात कमी पाऊस झाल्याने पाण्याचा साठा कमी आहे. त्यात मराठवाड्यासारख्या दृष्काळग्रस्त भागातील नागरिकांना आतापासूच उन्हाळ्याचा पर्यायाने पाण्याचा सामना करावा लागत आहे. यावर प्रशासनाकडूनही वेळोवेळी पाऊले उचलली जात आहेत.

## बीडच्या आदित्य शिक्षण संस्थेच्या वार्षिक स्नेह संमेलनाचे उद्घाटन



**प्रतिनिधी । बीड**

कृषि विद्यापीठाने विकसित केलेले नवीन वाण, आधुनिक शेतीसाठी विकसित केलेले ड्रोन तंत्रज्ञान, कृषि औद्योगीकरणाची उपकरणे व विकसित शेतीचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्यासाठी कृषि विद्यापीठ व सर्व शासकीय आणि खाजगी संस्थांची कृषि महाविद्यालये महत्वाची भूमिका बजावत असल्याची माहिती वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी यांनी दिली. बीड शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या वार्षिक स्नेह संमेलनाच्या उदघाटन समारोह प्रसंगी बीड येथे आले असताना त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कार्यकारी

**पुढील पेजवर**

## सिमेंट बंधाऱ्यांसाठी जलसंधारण महामंडळाकडून साडेपाच कोटींचा निधी मंजूर - आ.नमिता मुंदडा



**केज । प्रतिनिधी**

केज विधानसभा मतदार संघातील सिंचनाच्या कामासाठी जलसंधारण महामंडळाकडून ५ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. यातून ७ गेटेड सिमेंट बंधारे बांधण्यात येणार असल्याची माहिती आ. नमिता मुंदडा यांनी दिली. मागील चार वर्षात आ. नमिता यांच्या प्रयत्नातून अनेक केज मतदार संघातील अनेक गावात बंधाऱ्याची कामे झालेली आहेत. त्यामुळे या गावातील शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. उर्वरित आवश्यक ठिकाणी सिमेंट बंधाऱ्याची कामे व्हावीत यासाठी आ. मुंदडा यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरु ठेवला होता. आ. मुंदडा यांच्या विनंतीला प्रतिसाद देत महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाने केज विधानसभा मतदारसंघात ७ गेटेड सिमेंट बंधाऱ्यांचे काम करण्यासाठी ५ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून नाहोली, कोरडेवाडी, केज, उमरी, पठाण मांडवा, पाटोदा म., डोंगरपिंपळा या सात ठिकाणी सिमेंट बंधाऱ्याची कामे होणार आहेत. यानिमित्ताने केज मतदार संघातील सिंचन कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंधारण मंत्री संजय राठोड, भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे, बीडच्या खासदार प्रीतमताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत. दरम्यान, भविष्यात मतदार संघातील इतर आवश्यक त्या ठिकाणी बंधाऱ्यांच्या कामाच्या मंजुरीसाठी प्रयत्न सुरु असल्याचे आ. मुंदडा यांनी सांगितले.

## राजकारणात विष कालवण्याचं काम भाजपने केलं

बीड - लोकसभा निवडणुकांची घोषणा या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. भाजपवर टीका करताना धर्माच्या नावावर, जातीच्या नावावर जर कोणी राजकारणात विष कालवण्याचे काम कोणी केले असेल, तर ते फक्त भारतीय जनता पार्टीने केले आहे. एक फार छोटा प्रश्न मी तुम्हाला विचारतो, जो कदाचित तुमच्या मनामध्येही आला नसेल, आणि मी जर खोटं बोलत असेल तर या प्रश्नाचे उत्तर तुम्ही भारतीय जनता पार्टीच्या माणसाकडून घ्यावं. एवढा मोठा गाजावाजा करून सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याचे भूमिपूजन व उद्धाटन झाले. केवळ निवडणुकीच्या तोंडावर भूमिपूजन केले जातात. सर्वसामान्य नागरिकांना फसवण्याचे काम भाजप सरकारकडून होत असल्याचे पाहायला मिळते. याचबरोबर बेरोजगारांच्या हातातून रोजगार हिसकावून नेण्याचे पाप भाजप सरकार करतयं.

## सांगली लोकसभा काँगेसचं लढवणार

सांगली - महाविकास आघाडीच्या जागा वाटपात सांगली लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसचे पाटील यांच्या ऐवजी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षातून पाटील यांना देण्याबाबत जोरदार चर्चा सुरू आहे. सांगली लोकसभा मतदारसंघातील जागा काँग्रेस लढवणार असल्याचे आमदार विश्वजीत कदम यांनी सांगितले आहे. सांगली मतदारसंघातील जागा कोणाला मिळणार शिउबाठा कि काँग्रेस यावरून उलटसुलट चर्चा केली जात आहे. त्यावर सांगली लोकसभा मतदारसंघ काँग्रेसचाच आहे. तुम्ही कामाला लागा असा स्पष्ट निरोप आम्हाला मिळाला आहे. सध्या काही बातम्या पेरल्या जात आहेत. त्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांनी संभ्रमित होऊ नये. सांगली मतदारसंघातील जागा काँग्रेसच लढेल. आमदार कदम यांच्या नेतृत्वात आम्ही ताकदीने लढू, असे काँग्रेसच्या उमेदवाराचे दावेदार पाटील यांनी स्पष्ट केले आहे. मविआमध्ये जागा वाटपावरून नेहमी संभ्रम निर्माण होत असतो. अशातच आता सांगली लोकसभा मतदारसंघ कोण लढवणार अशा प्रश्नावर स्पष्ट मत दर्शवले आहे.

## परभणीत निरंतर स्वच्छता मोहिम

परभणी - आपले शहर स्वच्छ, सुंदर, प्रदूषणमुक्त, रोगराईमुक्त व सुसज्ज असावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून विविध भागांत सामान्य नागरिकांमध्ये स्वच्छतेची जनजागृती व्हावी, यासाठी स्वच्छता मोहीम अभियान राबविण्यास सुरुवात झाली. सहा महिन्यांपूर्वी ऑक्टोबरमध्ये सुरुवातीला १० सदस्य असलेल्या मोहिमेत आता प्रचार, प्रसार आणि कार्यामुळे सदस्य संख्या ३०० दुतापर्यंत पोहोचली आहे. दर रविवारी किमान दोन तास नवीन वसाहतीमध्ये श्रमदान स्वच्छता मोहीम राबवून स्वच्छ परभणीचा ध्यास सहभागी दूतांनी घेतला आहे. जगात जर्मनी आणि भारतात आपली परभणी असे नेहमीच बोलले जाते. याच परभणीचे आगळे वेगळेपण अनेक बाबींमध्ये आहे. हे वेगळेपण ठळकपणे जाणवते. शहराची वाढलेली व्याप्ती, वसाहतींचा विस्तार, लोकसंख्या आणि वाढलेल्या समस्या सोडविण्यासाठी केवळ प्रशासनावरच अवलंबून न राहता सामान्य नागरिकांच्या सहभागातून आणि प्रशासनाच्या सहकार्याने आपले शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी संकल्प करण्यात आला.

## नाशिकमध्ये आदिवासी मेळावा संपन्न

नाशिक - केंद्र सरकारच्या जनजातीय विकास विभाग, भारतीय जनजातीय सहकारी विपणन संघ तसेच राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभाग, शबरी आदिवासी विकास महामंडळ यांच्या माध्यमातून आदिवासी बांधवांच्या विकासासाठी व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योजना राबविण्यात येत आहेत. आदिवासी बांधवांनी जागरूक राहून त्या योजनांचा लाभ करून घ्यावा. तसेच आदिवासी संस्कृती, कला व पारंपरिक नृत्यांचा वारसा पुढे सुरू राहण्यासाठी त्याची तालुका व जिल्हा पातळीवर नोंदणी होणे आवश्यक असल्याने त्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत, अशा सूचना केंद्रीय आरोग्य, कुटुंब कल्याण तथा जनजातीय विकास राज्यमंत्री यांनी दिल्या. आदिवासी विकास विभाग, नाशिक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक व भारतीय जनजातीय सहकारी विपणन संघ मर्या. यांच्या संयुक्त विद्यमाने महाकवी कालिदास कलामंदिर येथे आयोजित आदिवासी कारागीर मेळाव्यात त्या बोलत होत्या.

## संपादकीय

# लोकशाहीला बळकटी

राजकारणातील घोडेबाजाराला लगाम घालण्यासाठी उचललेले पाऊल म्हणून याकडे पाहावे लागेल. आमदार, खासदार पैसे घेऊन सभागृहात भाषण किंवा मत देत असल्यास आता त्यांना कायदेशीर संरक्षण मिळणार नाही. लोकप्रतिनिधी असले तरी त्यांच्यावर फौजदारी खटला दाखल केला जाऊ शकतो, असा ऐतिहासिक निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या सातसदस्यीय खंडपीठाने अलीकडेच एकमताने दिला आहे. या निर्णयाच्या माध्यमातून संसद आणि विधिमंडळातील लोकप्रतिनिधींना मिळालेली विशेषाधिकारांची कवचकुंडले काढून घेतल्याचे मानले जात असले तरी मूलतः या निर्णयाचा मतितार्थ कायद्यापुढे सर्वजण समान आहेत, असा आहे. मुळात ज्यांनी देशातील भ्रष्टाचाराच्या विरोधात कायदे केले आणि ही विषवल्ली समूळ नष्ट करण्यासाठी युद्ध पुकारले, त्यांना या विशेषाधिकारांमुळे भ्रष्टाचार करण्याचा अप्रत्यक्ष अधिकार प्राप्त झालेला होता. हा पूर्णतः विरोधाभास होता. आतापर्यंत या विशेषाधिकारांच्या कवचकुंडलांमुळे अनेक आमदार आणि खासदार भ्रष्टाचाराच्या आरोपांनंतर कायदेशीर कारवाईपासून बचावले आहेत. कारण राज्यघटनेच्या कलम १०५/१९४ मध्ये असे म्हटले आहे की, लोकप्रतिनिधींच्या सभागृहात सांगितलेल्या किंवा केलेल्या कोणत्याही वर्तनावर कोणतीही कारवाई केली जाऊ शकत नाही. न्यायालयांनाही त्याविरोधात कारवाई करता येत नाही. पण हे कलम कोणत्याही एका लोकप्रतिनिधीच्या सुरक्षेसाठी नसून संपूर्ण सभागृहाच्या सुरक्षेसाठी बनवण्यात आले आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. तसेच या कलमांतर्गत मिळालेल्या सुरक्षाकवचाची झूल पांघरून लोकशाहीच्या मूल्यांना तिलांजली देणारे वर्तन केले जात असेल तर ते खपवून घेतले जाणार नाही, असाही संदेश सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिला आहे. यासंदर्भात २५ वर्षांपूर्वी पाच सदस्यांच्या पीठाने बहुमताने दिलेला निर्णय रद्द ठरविला आहे आणि लाचखोरी किंवा भ्रष्टाचाराच्या आरोपांमधून लोकप्रतिनिधीस विशेषाधिकाराची कवचकुंडले बहाल करण्यास स्पष्ट नकार दिला आहे. ज्या प्रकरणावर सुनावणी करताना हा ऐतिहासिक निकाल देण्यात आला, तो खटला प्रत्यक्षात मुक्ती मोर्चाच्या एका नेत्याशी संबंधित होता. २०१२ मध्ये झालेल्या राज्यसभा निवडणुकीच्या वेळी मुक्ती मोर्चाचे प्रमुख शिबू सोरेन यांची सून आणि पक्षाच्या (झामुमो) आमदार सीता सोरेन यांनी एका अपक्ष उमेदवाराकडून मतासाठी लाच स्वीकारल्याचा आरोप झाला होता. या आरोपामुळे सबंध देशभरात प्रचंड खळबळ उडाली होती. हा आरोप रद्द करण्यासाठी त्यांनी झारखंड उच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र १७ फेब्रुवारी २०१४ रोजी न्यायालयाकडून ही याचिका फेटाळण्यात आली. त्यामुळे सीता सोरेने यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आणि १९९८ च्या निकालानुसार आपले सासरे शिबू सोरेन यांना मिळालेले संरक्षण आपल्यालाही मिळावे, अशी मागणी केली. २०१९ मध्ये तत्कालीन सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्यासमोर ही याचिका सुनावणीस आली होती. पुढे २० सप्टेंबर २०२३ रोजी १९९८ च्या निकालाचा फेरविचार करण्यास मान्यता देण्यात आली. आता हा निकालच रद्दबातल ठरवण्यात आला आहे. १९९३ मध्ये तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर विरोधकांनी अविश्वास ठराव आणला होता. देशाच्या राजकीय इतिहासामध्ये ही घटना महत्त्वाची ठरण्याचे कारण म्हणजे या ठरावाच्या विरोधात मतदान करण्यासाठी मुक्ती मोर्चाच्या ५ नेत्यांनी लाच स्वीकारल्याचा आरोप झाला होता. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले असताना १९९८ मध्ये सभागृहातील वर्तनासाठी सदस्यांना कायद्याचे संरक्षण असल्याचा निर्वाळा बहुमताने देण्यात आला. कलम १०५ आणि १९४ अंतर्गत खासदार किंवा आमदाराला गुन्हेगारी न्यायालयामध्ये लाचखोरीच्या आरोपासाठी खटला चालवण्यापासून संरक्षण असल्याचा दावा करता येतो का याबद्दल विचार करण्यात आल्याचे न्यायालयाने म्हटले होते. सरन्यायाधीश यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने १९९८ चा निकाल रद्द ठरवला. झारखंड मुक्ती मोर्चा लाचखोरी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचे आकलन कलम १०५ आणि १९४ यांच्याशी विसंगत होते, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले आहे. या कलमांचा हेतू चर्चा, सभागृहातील वैचारिक देवाणघेवाण करण्यासाठी असल्याने एखादा सदस्य लाचखोरी करून मतदान किंवा भाषण करतो तेव्हा तो हेतूच नष्ट होत असल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे. ताजा निर्णय हा लोकशाहीच्या शुद्धीकरणासाठीचे आवश्यक पाऊल म्हणून पाहिला गेला पाहिजे. लोकशाहीमध्ये जनता सार्वभौम असली तरी भारतीय राज्यघटनेने जनतेनेच नियुक्त केलेल्या लोकप्रतिनिधींना विशेषाधिकार बहाल केलेले आहेत; परंतु ही विशेषाधिकारांची कवचकुंडले घालून बेकायदेशीर आणि लोकशाहीच्या मूळ तत्त्वांची पायमल्ली करणारी कृत्ये काही लोकप्रतिनिधींकडून केली गेल्याचे मागील काळात दिसून आले आहे. 'नोट फॉर व्होट'सारखी प्रकरणे असोत किंवा आमदार-खासदारांचा घोडेबाजार असो, यांसारख्या प्रकरणांमुळे जनतेचा भ्रमनिरास होण्याची वेळ समीप आली होती. अशा काळात आलेला हा निर्णय आशादायक म्हणावा लागेल. पक्षांतरविरोधी कायद्याला बगल देऊन सरकार पाडण्याच्या आणि आमदारांनी दुसर्या पक्षाच्या सरकारमध्ये सामील होण्याच्या घटना गेल्या काही वर्षांत वाढल्या असताना, राज्यसभा - विधान परिषदांच्या निवडणुकीत लाच घेणे आणि दुसर्या पक्षाच्या उमेदवाराच्या बाजूने मतदान करणे अशा घटनांमध्ये वाढ झालेली असताना आलेला हा निर्णय लाचखोरी करणार्या लोकप्रतिनिधींना वेसण घालणारा आहे. अलीकडे उत्तर प्रदेश आणि हिमाचल प्रदेशात ज्या पद्धतीने लोकप्रतिनिधींसाठी असणार्या घटनात्मक जबाबदारीच्या, वर्तनाच्या सीमारेषा ओलांडून दुसर्या पक्षाच्या उमेदवाराच्या बाजूने मतदान करण्याचा प्रकार समोर आला असून त्यामध्ये घोडेबाजाराचा आरोप होत आहेत. संबंधित आमदारांच्या पक्षांनी त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली असली तरी यामुळे लोकशाही मूल्यांच्या पावित्र्याला धक्का लागला आहे. खासदार आणि आमदार हे सर्वसामान्यांचे प्रतिनिधी आहेत. जेव्हा ते लाच घेऊन प्रश्न विचारतात किंवा इतर पक्षाच्या समर्थनार्थ बाहेर पडतात तेव्हा ज्या मतदारांनी त्यांना बहुमत दिले होते, त्या सर्व मतदारांची फसवणूक होत असते.

# महाराष्ट्र पोलिस भरतीची अधिसूचना प्रसिध्द



**मुंबई । वृत्तसेवा**

नोकरीच्या शोधात असणाऱ्यांसाठी मोठी संधी आहे. विशेष म्हणजे ला सुरूवात झालीये. नुकताच या भरती प्रक्रियेबद्दलची अधिसूचना ही प्रसिद्ध करण्यात आलीये. इच्छुकांनी अजिबातच वेळ वाया न घालता या भरती प्रक्रियेसाठी अर्ज ही करावीत. अनेकांचे पोलिस होण्याचे स्वप्न असते. आता हे स्वप्न लवकरच पूर्ण होणार आहे. खरोखरच ही एकप्रकारची मोठी संधीच म्हणावी लागणार आहे. ही एकप्रकारची मेगा भरती किंवा बंपर भरतीच म्हणावी लागेल. इच्छुकांनी फटाफट या भरती प्रक्रियेसाठी अर्ज ही करावीत. महाराष्ट्र राज्य पोलिस विभागाकडून कॉन्स्टेबल भरती २०२४ ची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आलीये. तब्बल १७,४७१ जागा या भरल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे या भरती प्रक्रियेसाठी आपल्याला फक्त आणि फक्त ऑनलाईन पद्धतीनेच अर्ज ही करावी लागणार आहेत. महाराष्ट्र पोलिस भरती २०२४ साठी अर्ज ही मागवण्यात आली आहेत. या भरती प्रक्रियेसाठी आपल्याला ऑनलाईन पद्धतीने अर्ज ही करावी लागणार आहेत. या भरती प्रक्रियेसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख ही ३१ मार्च २०२४ आहे. इच्छुकांनी त्यापूर्वीच या भरती प्रक्रियेसाठी अर्ज ही करावी लागणार आहेत. साईटवर जाऊन तुम्हाला या भरती प्रक्रियेसाठी अर्ज ही करावी लागणार आहेत. शारीरिक चाचणी, कौशल्य चाचणी आणि लेखी परीक्षेनंतर उमेदवाराची निवड ही केली जाईल. या भरती प्रक्रियेतून जेल कॉन्स्टेबल, पोलीस कॉन्स्टेबल, पोलीस कॉन्स्टेबल ड्रायव्हर पोलीस कॉन्स्टेबल बँड्समन आणि सशस्त्र पोलीस कॉन्स्टेबल ही पदे भरली जाणार आहेत. नोकरीच्या शोधात असणाऱ्यांसाठी खरोखरच ही एकप्रकारची मोठी संधीच म्हणावी लागेल. गेल्या काही वर्षांपासून तरूण मंडळी ही या पोलिस भरतीची आतुरतेने वाट पाहताना दिसत आहेत. शेवटी या भरती प्रक्रियेबद्दलची अधिसूचना ही जाहिर करण्यात आलीये. ऑनलाईन प्रक्रिया सुरू देखील झालीये. परत एकदा लक्षात ठेवा की, या भरती प्रक्रियेसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख ही ३१ मार्च २०२४ आहे, त्यापूर्वीच आपल्याला या भरती प्रक्रियेसाठी अर्ज ही करावी लागणार आहेत.

# विद्यार्थ्यांना सर्वांगिण प्रगतीची संधी द्या -राज्यपाल रमेश बैस

**पुणे । वृत्तसेवा**

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गृहपाठ देण्याऐवजी शाळेतच अभ्यास करून घ्यावा आणि वारसा स्थळ तसेच उद्यानांना भेटीचे उपमक्रम राबवून त्यांच्या सर्वांगिण प्रगतीस हातभार लावावा, असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी केले. वेध प्रोफेशनल लर्निंग कम्युनिटीद्वारा लोणावळा येथे अयोजित शिक्षक संमेलनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला मिशन मनरेगाचे व्यवस्थापक नंद कुमार, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, वेधचे समन्वयक निलेश घुगे आदी उपस्थित होते. राज्यपाल बैस म्हणाले, जगातील अनेक राष्ट्रात विद्यार्थ्यांना गृहपाठ दिला जात नाही, आपणही हे धोरण स्विकारण्याची गरज आहे. समूहामध्ये विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीचा विस्तार होतो, त्यांच्यात एकत्रितपणे पुढे जाण्याची भावना निर्माण होते. खेळात सहभाग वाढल्याने विजय आणि पराभव सहजतेने पचविण्याची क्षमता निर्माण होते. मुलांना मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांपासून दूर ठेवण्यासाठीदेखील प्रयत्न करावे लागतील, त्यांच्यात नव्या गोष्टींविषयी उत्सुकता निर्माण व्हावी म्हणून त्यांना प्रश्न विचारण्यासाठी प्रोत्साहित करावे लागेल. देशाच्या विकासात शिक्षणाचे महत्वाचे योगदान असल्याने शिक्षकांनी आपल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा बारकाईने अभ्यास करण्याची गरज आहे. वेध परिवाराने विकसित केलेल्या प्रशिक्षण पद्धतीत शिक्षक विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनासाठी प्रोत्साहित करतात. देशाच्या आत्मनिर्भरतेसाठी विद्यार्थी सक्षम होणे गरजेचे असून २१ व्या शतकात आवश्यक कौशल्य त्यांने संपादन करावे म्हणून वर्गाच्या आत आणि बाहेरच्या शैक्षणिक प्रक्रीयेत बदल घडवून आणावे लागतील. शिक्षणात तंत्रज्ञानाच्या समावेशाने विद्यार्थ्यांचे ज्ञान अद्ययावत करून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करावा, असे आवाहन राज्यपाल श्री.बैस यांनी केले. शिक्षकांनी केवळ शासनातर्फे आयोजित प्रशिक्षणावर अवलंबून न राहता प्रोफेशनल कम्युनिटी लर्निंगद्वारे एकमेकांशी जोडले जावे. याद्वारे आपल्या अडचणी दूर करण्यासोबत शैक्षणिक प्रक्रीयेबाबत अद्ययावत रहाणे शक्य होईल, असे श्री.बैस म्हणाले. आर्टीफिशल इंटेलिजन्सचा उपयोग वैयक्तिक अध्ययनासाठी करता येणे शक्य आहे. एआयद्वारे विद्यार्थ्याला शिक्षण घेण्याची त्याच्यासाठी असलेली योग्य पद्धती जाणून घेणे शक्य होते, तर दुसरीकडे विद्यार्थ्यांमध्ये कोणते कौशल्य आहेत याची माहिती शिक्षकांना मिळू शकते, असेही त्यांनी सांगितले. देओल म्हणाले, शाळेत विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षकांची महत्वाची भूमिका असते. शिक्षकांनी विद्यार्थांना शिक्षण देण्याबरोबरच त्यांना प्रोत्साहित करावे. सर्वेक्षणातून असे दिसून आले आहे की पट संख्या कमी असलेल्या शाळेत मुले अधिक असलेल्या शाळेपेक्षा विद्यार्थ्यांची प्रगती कमी आहे. म्हणजेच मुले समूहात राहून अधिक चांगल्याप्रकारे शिकतात. विद्यार्थ्यांनी स्वतः शिक्षण घ्यावे यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले. नंदकुमार यांनी सादरीकरणाद्वारे विद्यार्थ्यांच्या अडी अडचणी सोडविण्यासाठी, गुणवत्ता सुधारण्यासाठी वेध परिवार करीत असलेल्या कामाची माहिती दिली. प्रास्ताविकात निलेश घुगे यांनी वेध परिवाराच्या कार्याची माहिती दिली. यावेळी श्रीमती रोहिणी पिंपळखेडकर यांच्या 'वेध कृती संकलन' व 'स्पोकन इंग्लिश वेध कृती' या पुस्तिकेचे व श्रीमती केवरा सेन यांच्या 'बेसिक जपानी भाषा' या पुस्तकाचे प्रकाशन राज्यपाल बैस यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच व्यावसायिक शिक्षण समुदायाच्या सदस्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

# समतोल ढासळल्याने पृथ्वी

ऊर्जेमुळे जगभरात नवीन संकट निर्माण झाले आहे. आता विकसित देश आणि विकसनशील देशांतील मतभेद आणि स्पर्धा ही कार्बन डायऑक्साईड उत्सर्जनावरून आहे. कोळशाच्या अधिक वापराने काळा धूर जमा होत आहे. विकसनशील देशात ऊर्जेसाठी अन्य कोणताही मार्ग किंवा स्रोत नसल्याने त्यावरचे अवलंबित्व वाढले आहे. दुसरीकडे विकसित देश मात्र पृथ्वीला संकटात टाकण्यात विकसनशील देश जबाबदार असल्याचे खापर ङ्गोडत आहेत. आता या देशांचे पोट भरले असून ते दुसर्यांना सल्ला देत आहेत. वास्तविक, वातावरणीय बदलांचे मूळ बदलत्या भोगवादी जीवनशैलीत आहे. त्यामुळे विलासीपणाची हाव सोडून देणे हा यावरचा तरणोपाय आहे. गेल्या दोनशे वर्षांत आपण ज्या वेगाने आपल्या सवयी, सुविधा बदलण्याचा प्रयत्न केला, त्यापेक्षा दुपट आणि तिपट वेगाने निसर्गात बदल झाला आहे. ही गंभीर बाब अधिक समजून घेणे महत्त्वाचे ठरते. कारण शेवटी सुविधा, विकास किवा आपल्या पोटापाण्याचा प्रश्न हा थेटपणे किंवा अप्रत्यक्षपणे का होईना निसर्गाच्या स्रोताशी जोडलेला आहे. असे घडत असेल तर बदलत्या वातावरणात निसर्ग आणि पर्यावरणाचा सर्वाधिक ङ्गटका या घटकांनाच बसणार आहे. अर्थात ही बाब अधिक खोलवर सांगण्याची गरज नाही. ते जाणून घेण्यासाठी गेल्या दोन दशकांपासून अनेक प्रयत्न झाले. निसर्गाशी संबंधित संशोधक आणि अभ्यासकांना या बदलाचे संकेत मिळाले आणि बदलत्या निसर्गाचा संदेश जनमानसांपर्यंत पोचवण्यासाठीही प्रयत्न झाले आहेत. सध्या ज्या रितीने आपण जीवनशैलीला पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहोत, त्यातून आता ङ्गारशी अपेक्षा राहिलेली नाही. कारण पृथ्वीला देखील मर्यादा आहेत. त्यामुळेच आपण कोठे ना कोठे तथाकथित विकासावर अंकुश बसवणे गरजेचे झाले आहे. निसर्ग ही मानवी जीवसृष्टीची सर्वांत मोठी गरज आहे. त्यामुळेच निसर्ग संवर्धनासाठी मोठी चळवळी उभ्या राहिलेल्या दिसून आल्या आहेत. तथापि, निसर्ग हा केवळ गरजेसाठी आहे, मानवाच्या ऐशोरामाच्या गरजा किंवा विलासी वृत्तीतून निर्माण झालेला हव्यास पूर्ण करण्यासाठी नाही. परंतु कालांतराने ऐशोराम ही आपली गरज बनली. कालांतराने आरामदायी जीवन ही निकड वाटू लागली. आपण त्याच्या आहारी कधी गेलो, याचा थांगपत्ताही लागला नाही. परंतु आता त्याचे प्रमाण एवढे वाढले आहे की पृथ्वी हे ओझे आता सहन करू शकत नाही. परिणामी काही गरजांना कठीण काळातून जावे लागेल. छंदांचे अनेक उदाहरणे पाहवयास मिळतील. मोटारीचे पाहा. वाहननिर्मिती करणार्या कंपन्यांनी किती प्रकारची उत्पादने बाजारात आणली आहेत. त्याला आता स्टेटस सिम्बॉल जोडला आहे. याखेरीज अन्य सुविधांचा विचार केल्यास एसी, टीव्हीचे उदाहरण घ्या. मर्यादेत असेपर्यंत सर्वकाही ठिक होते. परंतु आता त्यातील वैविध्यपणा आणि रिमोट तंत्र आले आहे. म्हणजेच शारीरिक श्रम न करता सर्वकाही करायचे आहे. पायातील चपला देखील हजार रुपयांच्या घरात गेल्या आहेत. सर्व ब्रँड आणि स्टेटसला जोडले जात आहेत. या मोठ्या बाजारपेठेने आपल्याला चोहुबाजूंनी घेरले आहे. दुर्दैवाने अशा प्रकारचे लोक जगात अगोदर नव्हते, परंतु शहराच्या विकासाने मागणी वाढली आहे. त्याच्या विळख्यात ग्रामीण भागही आला आहे. शहरे ही आता सुविधा आणि आरामाचे केंद्र बनत असून गर्दी वाढतच चालली आहे. आज जगातील ५० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या शहरात आली आहे. पूर्वी अशा प्रकारच्या जीवनशैलीचा उपभोग केवळ दहा टक्केच लोक घेत होते. आता सर्वांची या जीवनशैलीचा अंगीकार करण्यासाठी धावपळ सुरू आहे. त्यांच्याकडे पाहणार्या अनेक घटकांवर देखील परिणाम झाला आहे. आपण ज्या रितीने हौस आणि छंद जोपासत आहोत, त्याची भरपाई व्यापक रुपाने करावी लागत आहे. उदा. शहरांची वाढती संख्या हे जीवंत उदाहरण आहे. आपल्या सर्वांना सर्व सर्वसुविधायुक्त कन्ङ्गर्ट झोन हवा आहे. शहरातच रोजगाराचे मार्ग उपलब्ध आहेत असे आपण गृहित धरून चालत आहोत. आपण एकीकडे शेतीसारखे पारंपरिक रोजगाराचे मार्ग बंद केलेले असताना औद्योगिक क्रांतीनंतर त्याचा आकार खूपच लहान केला आणि त्याची जबाबदारी एका विशिष्ट घटकांवर सोपवून हात झटकले आहेत. जगभरात गेल्या शंभर दोनशे वर्षांच्या तुलनेत शेतीचे आकारमान कमी झाले. एवढेच नाही तर शेतीच्या उत्पन्नावरही परिणाम झाला आहे. आपल्या प्राथमिक गरजा बदलल्याने कृषी क्षेत्राच्या वैविध्यपणावर परिणाम झाला. आता अमेरिकेचेच उदाहरण घ्या. त्याने शेतीचे रुप एवढे पालटून टाकले की आता इंधन उत्पादन करणार्या शेतीला प्रोत्साहन दिले जात आहे. मक्याचा उपयोग इथेनॉलच रुपाने केला जात आहे. आता हे प्रस्थ जगाच्या कानाकोपर्यात पोचले आहे. जगातील असंख्य देश जसे अमेरिका, जपान अरबमध्ये शेती ही त्यांच्या जीडीपीच्या एक ते तीन टक्क्यांच्या आसपास राहत आहे. साहजिकच ऊर्जा ही मोठी गरज असून शहरांच्या वाढत्या संख्येने आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापक परिणाम होत आहे. ऊर्जेमुळे जगभरात नवीन संकट निर्माण झाले आहे. आता विकसित देश आणि विकसनशील देशांतील मतभेद आणि स्पर्धा ही कार्बन डायऑक्साईड उत्सर्जनावरून आहे. कोळशाच्या अधिक वापराने धूर जमा होत आहे.

## पान १ वरून

### निवडणूक तोंडावर तरीही

नाही. दुसरीकडे अकोल्यात फुंडकर यांच्यापासून ते धोत्रे यांच्या पर्यंतचा भाजपाचा सततचा विजय पाहता हा मतदारसंघ भाजपाचा बालेकिल्ला म्हणवला जातोय खरा, पण असे असताना यंदा येथील उमेदवार नक्की कोण हे गुलदस्त्यातच आहे. वाशिममध्ये सहयोगी शिवसेना शिंदे गटाकडे खासदारकी असली तरी तेथे भाजपाच्या जोर बैठका अधिक सुरू आहेत. शिवसेनेचे उद्धव ठाकरे येऊन गेलेत, त्यावेळी त्यांच्या पक्षाच्या उमेदवारीची घोषणा अपेक्षिली जात होती; पण तसे काही झाले नाही. अर्थात विद्यमान खासदार प्रतापराव जाधव यांच्याही उमेदवारी बाबत संभ्रमच असल्याने सर्वांच्याच हाती ''वाट बघणे'' आले आहे. निवडणुकीची घोषणा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली असतानाही जागा वाटपाची व उमेदवारांची निश्चिती नसल्याने संभ्रमाचेच ढग दाटून आहेत.

### मतदारांनो कोण काय

जेवढे लक्ष नाही, तेवढेच मतदारांचे देखील नाही. त्यामुळे मतदारांनी आता जागृत होऊन या सर्व गोष्टींकडे बारकाईने लक्ष ठेवणे आवश्यक आहे. शेतकरी, बेरोजगार, तरुण यांचे सह अनेकांच्या समस्या त्यांना भेडसावत आहेत. सत्तेतला कोणीही शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी समोर येत नाही. त्यामुळे पीक कर्ज, पिक विमा, बी बियाणे खरेदी आणि मालाची विक्री या सर्व बाबी पाहता कोणताही सत्ताधारी बारकाईने लक्ष देत नसल्यामुळे शेतकऱ्यांची प्रचंड नुकसान होत आहे. त्यामुळे या सर्व बाबी आता एक नागरिक म्हणून आपल्याला पहायला पाहिजेत. यावर बारकाईने अभ्यास करून सर्व नेत्यांबद्दलचे आपले मत त्यांच्या बोलण्यावरून आणि वागण्यावरून तयार करून ठेवावे. नंतरच मतदान करावे. भूलथापांना बळी पडू नये, असेही ड. देशमुख यांनी म्हटले आहे.

### बीडच्या आदित्य शिक्षण

परिषद सदस्य डॉ. आदिती सारडा, कृषि विद्यापीठाचे संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता डॉ. उदय खोडके, आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक आणि द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकचे अध्यक्ष डॉ. आदित्य सारडा, डॉ. अरुण मुंडे, डॉ. तांबे, डॉ. हिमांशू, डॉ. कुलकर्णी, डॉ. हिंगणे, डॉ. कचरे, प्रा. शाम भुतडा, प्रा, बहिरवाळ, प्रा. उमेश सत्कर, डॉ. मोरे, डॉ. खेडकर यांची उपस्थित होते. पुढे बोलताना कुलगुरू डॉ. इंद्र मणी म्हणाले की, मराठवाड्यातील कृषि अभ्यासक्रमांची विद्यापीठातील घटक व खाजगी महाविद्यालये आता विद्यापीठाच्या बरोबरीने शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात योगदान देण्याचे कार्य करत आहेत. कृषि विद्यापीठाकडून विकसित तंत्रज्ञान शेतकऱ्यांना पोहोचविण्यात म्हणजेच एका अर्थाने कृषि विद्यापीठाच्या 'कृषि विस्तार' या भूमिकेला समर्पक कार्य करण्याबरोबरच कृषि शिक्षण देऊन दरवर्षी अनेक कृषि पदवीधर समजाला देत विद्यापीठाच्या 'कृषि शिक्षण' या भूमिकेला मोठ्या प्रमाणात हातभार लावत आहेत व देशाच्या अन्नधान्य साठ्यामध्ये विकसित बी-बियाणांचा वापर करून अमुलाग्र बदल केला आहे. त्याप्रमाणे साधारणत: १५ वर्षापूर्वी सुरु झालेल्या 'आदित्य कृषि व संलग्न' अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या माध्यमातून आजपर्यंत ५००० कृषि पदवीधर वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने समाजासाठी दिलेले आहेत व आज हे पदवीधर देशभर कृषि संशोधन, कृषि विकास व विस्ताराचे कार्य करत आहेत, ही उल्लेखनीय व बीड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असल्याचेही ते म्हणाले. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी परिषद सदस्या डॉ. आदिती सारडा यांनी या कार्यास मोठ्या प्रमाणात सहकार्य व पाठबळ दिल्याबद्दल डॉ. इंद्र मणी यांनी डॉ. आदिती सारडा यांचे विशेष आभार मानत त्यांचे कौतुकही केले. कृषि विद्यापीठ संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता डॉ. उदय खोडके यांनी सांगितले की, मागील वर्षी आपण 'अंतरराष्ट्रीय तृणधान्य' वर्ष साजरे केले त्याकाळात आदित्य कृषि महाविद्यालयातील ठ-थए च्या विद्यार्थ्यांनी बीड जिल्हा कृषि अधिक्षक कार्यालय यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या कृषि विस्तार कार्याचे योगदान अमूल्य ठरले असल्याचे खोडके म्हणाले. येणाऱ्या खरीप हंगामापासून विद्यापीठामध्ये विकसित केलेली बी-बियाणे 'आदित्य' च्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येतील व जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक व सामाजिक स्थान बळकट करण्यासाठी कृषि विद्यापीठ सातत्याने प्रयत्न करणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. इंद्र मणी यांनी दिली.

# मराठी पत्रकार संघाची कार्यकारिणीची बिनविरोध निवड

**जालना । वृत्तसेवा**

भोकरदन शहरातील रत्नमाला लॉन्स येथे रविवारी १० मार्च रोजी सकाळी अकरा वाजेला मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष फकिरा देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा कार्यकारीणी सदस्य गणेश औटी यांच्या उपस्थितीत पत्रकार संघाची बैठक आयोजीत करण्यात आली . यावेळी तालुका पत्रकार संघाची नवीन कार्यकारीणी जाहीर करण्यासंबंधी चर्चा करण्यात येऊन या बैठकीत सर्वानुमते भोकरदन तालुका मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी शेख इरफान तर सचिवपदी सांडु नामदे आणी कार्याध्यक्ष पदी संजय पैठणकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या प्रसंगी मावळते अध्यक्ष दिपक सोळंके व सचिव सुरेश बनकर यांनी नुतन कार्यकारिणीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यासह उर्वरित कार्यकारिणी पुढील प्रमाणे असुन शहर



उपाध्यक्षपदी कमलकिशोर जोगदंडे, अमोल शिंदे तर ग्रामीण उपाध्यक्षपदी रविंद्र लोखंडे, देवलाल आकोदे , सहसचिव पदी विलास खांडवे, रमेश पंडीत कोषाध्यक्षपदी शेख सलीम, रामसिंग सोळंकेयांची निवड करण्यात आली तर कार्यकारणी सदस्य म्हणुन राम पार्वे, फैजुला पठाण, डी. एन. गावंडे, संदिप देशमुख, विजय बावस्कर, शेख सादिक, युवराज पगारे ,सुरेश शेळके, राम शिंदे,यांची निवड करण्यात आली. यावेळी जेष्ठ पत्रकार विजय सोनवणे, रविंद्र देशपांडे, नानासाहेब वानखेडे, सुनिल जाधव, महेश देशपांडे, तुषार पाटिल, वैभव सोनवणे, रमेश इंगळे, सुरेश गिराम, प्रताप साळवे,विश्वास धसाळ ,इम्रान खान, अरुण ठोंबरे, शिवा बोर्डे, अकबर खान, विजय बावस्कर , कैलास दांडगे, गजानन देशमुख, फुलसिंग शिंदे, मिलींद सावंत, राजेश गरुड, सहेजाद मिर्झा, यांच्यासह पत्रकार संघाचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकसभा निवडणुकीसाठी अधिकारी लागले कामाला

**संभाजीनगर । वृत्तसेवा**

आठवड्याभरात लोकसभा निवडणूकांची घोषणा होण्याची शक्यता असल्याने महसुल अधिकाऱ्यां कडून तयारीवर अंतिम हात फिरवला जात आहे. प्रत्येक अधिकाऱ्यावर स्वतंत्र जबाबदारी देण्यात आली असून जिल्हास्तरावरुन त्याबाबत दररोजचा आढावा घेण्यात येत आहे. लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव असलेल्या लोकसभा निवडणूका अगदी काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. सोमवारनंतर कोणत्याही क्षणी निवडणूकांचा बिगुल वाजणार असल्याने राजकीय पक्षांमध्ये उत्सुकता शिगेला पोहचली आहे. दुसरीकडे प्रशासकीय पातळीवर निवडणूकीसाठीची आवश्यक ती तयारी अंतिम टप्यात पोहचली आहे. त्यामुळे मतदारसंघाचा विस्तार बघता निर्विघ्न पणे निवडणूका पार पाडण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. लोकसभेसाठी महसूल प्रशासनाने निरनिराळ्या समित्या गठीत केल्या आहेत. त्यामध्ये ईव्हीएम, मन्युषबळ, वाहतूक व्यवस्था, व्हीडीओ रेकॉर्डींग, खर्च नियंत्रण, भोजन, वाहनव्यवस्था अशा विविध समित्यांचा समावेश आहे. प्रत्येक समितीकरीता स्वतंत्र नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जलज शर्मा हे सदर समित्यांचा दररोज आढावा घेत आहेत. आढाव्यावेळी कोठे काही कमी असल्यास ती तातडीने दुर करण्यात येत आहेत. लोकसभा निवडणूकीसाठी महसुल अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करताना प्रत्यक्ष मतदान व मतमोजणीसाठी तयारी केली जात आहे. त्याकरीता विविध शासकीय विभागांबरोबरच जिल्ह्यातील शाळा-महाविद्यालयांचे कर्मचारी नियुक्त केले जात आहे. संबंधित कर्मचाऱ्यांना तालूकास्तरावरच मतदान तसेच ईव्हीएमबाबतचे मास्टर ट्रेनरकडून प्रशिक्षण देण्यात येत आहे. या दरम्यान, कर्मचाऱ्यांना येणाऱ्या अडचणींचे निरसन केला जात आहे.

## लोकसभा निवडणुकीपुर्वीच निवडणूक आयुक्तांचा राजीनामा

**मुंबई । वृत्तसेवा**

लोकसभा निवडणुकीची घोषणा होण्यासाठी अवघे काही दिवस उरलेले असतानाच निवडणूक आयुक्त अरुण गोयल यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे. गोयल यांनी तडकाफडकी राजीनामा देण्यामागचं कारण मात्र गुलदस्त्यात आहे. त्यामुळं चर्चेल उधाण आलं आहे. केंद्रीय निवडणूक आयोगानं शुक्रवारी केंद्रीय गृह मंत्रालय आणि रेल्वे अधिकाऱ्यांसोबत सुरक्षेबाबत बैठक घेतली होती. यामध्ये देशभरात सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या तैनातीबाबत चर्चा झाली. लोकसभा निवडणुकांबरोबरच निवडणूक आयोगाला आंध्र प्रदेश, ओडिशा, सिक्कीम आणि अरुणाचल प्रदेशमध्ये विधानसभा निवडणुका घ्यायच्या आहेत. निवडणूक आयोगाचं पथक सर्व राज्यांचा दौरा करून निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यात व्यग्र आहे. एप्रिल-मेमध्ये देशात लोकसभा निवडणुका होऊ शकतात, असा अंदाज आहे. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त (नियुक्ती, सेवा शर्ती आणि कार्यकाळ) अधिनियम, २०२३ च्या कलम ११ च्या खंड (१) च्या अनुषंगानं ९ मार्च २०२४ पासून निवडणूक आयुक्त अरुण गोयल यांनी दिलेला राजीनामा स्वीकारताना आनंद होत आहे, असं राजपत्रित अधिसूचनेत म्हटलं आहे. अरुण गोयल यांच्या राजीनाम्यामुळं निवडणूक आयोगात आता २ पदं रिक्त झाली आहेत. अरुण गोयल यांनी २१ नोव्हेंबर २०२२ रोजी निवडणूक आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारला होता. १९८५ च्या बॅचचे आयएएस अधिकारी असलेल्या गोयल यांनी यापूर्वी भारत सरकारच्या अवजड उद्योग मंत्रालयाचे सचिव म्हणून काम केलं आहे. गोयल यांनी दिल्ली विकास प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, कामगार व रोजगार खात्याचे अतिरिक्त सचिव आणि आर्थिक सल्लागार, अर्थ मंत्रालयांतर्गत येणाऱ्या महसूल विभागाचे सहसचिव म्हणूनही काम पाहिलं आहे. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयातही त्यांनी काम केलं होतं. २०२२ मध्ये निवडणूक आयुक्त पदी नियुक्ती होण्यापूर्वी त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. राजीव कुमार यांचा कार्यकाळ फेब्रुवारी २०२५ मध्ये संपणार आहे. त्यानंतर अरुण गोयल पुढील मुख्य निवडणूक आयुक्त होण्याच्या मार्गावर होते. कायद्यानुसार निवडणूक आयुक्त किंवा मुख्य निवडणूक आयुक्त पद सहा वर्षांपर्यंत किंवा वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत राहू शकते. निवडणूक आयुक्त म्हणून त्यांच्या नियुक्तीला २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं होतं. त्यावर सुनावणी करताना मार्च २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठानं गोयल यांच्या नियुक्तीवर ताशेरे ओढले होते. सरकारनं गोयल यांची नियुक्तीच घाईघाईनं केली आहे. शिवाय, त्यांना दोन वर्षांपेक्षा थोडा जास्त कार्यकाळ मिळणार आहे. कायद्यानुसार निवडणूक आयुक्तांना सहा वर्षांचा कार्यकाळ निश्चित करण्यात आला आहे.

### ठाकरेंचा भाजपला धक्का

**मुंबई । वृत्तसेवा**

वाहतं आहे. काहीच दिवसात लोकसभा निवडणुकीची घोषणा होऊ शकते. अशात कोणत्या मतदारसंघातून कुणाला उमेदवारी दिली जाणार याबाबत चर्चा होत आहे. अशातच काही नेत्यांचं पक्षांतरही पाहायला मिळू शकतं. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे भाजपला मोठा धक्का देण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे. बड्या महिला नेत्याचा शिवसेना ठाकरे गटात पक्षप्रवेश होऊ शकतो, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. शिवाय या महिला नेत्याला लोकसभेला उमेदवारीही दिली जाण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीच्या घोषणेआधी उद्धव ठाकरे भाजपला मोठा धक्का देण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे. शिवसेना ठाकरे ठाकरे गटाकडून जळगाव लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवाराची चाचपणी सुरु आहे. अशात भाजपच्या नेत्या ड. ललिता पाटील यांना ठाकरे गटात घेण्याबाबत चर्चा सुरु आहे. पुढच्या दोन दिवसात ललिता पाटील या ठाकरे गटात प्रवेश करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. मुंबईत ललिता पाटील यांचा शिवसेना ठाकरे गटात प्रवेश होण्याची शक्यता आहे.

## महाराष्ट्रात होणार सहा लेनचा नवीन महामार्ग

**संभाजीनगर । वृत्तसेवा**



महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर महामार्गांचे जाळे विकसित करण्यात येत असून या माध्यमातून महाराष्ट्रातील महत्त्वाचे शहरे एकमेकांना जोडण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे नक्कीच भविष्य काळामध्ये जेव्हा हे महामार्ग वाहतुकीसाठी खुले होतील तेव्हा त्यांचा फायदा हा कमीत कमी वेळेमध्ये प्रवासासाठी तर होईलच परंतु ग्रामीण भागातील विकास आणि कृषी व उद्योग क्षेत्रासाठी देखील मोठ्या प्रमाणावर होणार आहे. उदाहरणच घ्यायची झाले तर नागपूर ते मुंबई यादरम्यान झालेल्या समृद्धी महामार्गामुळे महाराष्ट्रातील अनेक शहरांमधील प्रवासाचे अंतर कमी झाले आहे. परंतु अनेक दृष्टिकोनातून महाराष्ट्राच्या विकासासाठी समृद्धी महामार्ग महत्त्वाचा ठरणार आहे. अगदी याच पद्धतीने जर नागपूर ते संभाजीनगर हा २३० किलोमीटर लांबीचा होऊ घातलेला ६ पदरी ग्रीनफिल्ड एक्सप्रेस वे पाहिला तर यामुळे नागपूर ते संभाजीनगर हे अंतर चार तासात पूर्ण करता येणे शक्य होणार आहे. तसे संभाजीनगर वरून पुणे अवघ्या दोन तासात गाठता येणार आहे. राज्यामध्ये पुणे- नगर- संभाजीनगर असा २३० किलोमीटर लांबीचा सहा पदरी नवीन ग्रीनफिल्ड महामार्ग तयार होणार असून याकरिता केंद्राच्या रस्ते परिवहन व महामार्ग विभाग व महाराष्ट्र सरकारचा सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला असून या महामार्गामुळे पुणे शहराची समृद्धी महामार्गासोबत कनेक्टिव्हिटी निर्माण होण्यास मदत होणार आहे. इतकेच नाही तर या एक्सप्रेस वे मुळे नागपूर ते संभाजीनगर हे अंतर चार तासांमध्ये पूर्ण करता येणार आहे व इतकेच नाही तर संभाजीनगर वरून पुणे फक्त दोन तासात गाठता येणार आहे. एकूण २३० किलोमीटर लांबीचा हा ६ पदरी एक्सप्रेस वे असणारा असून या तीनही जिल्ह्यांच्या विकासासाठी हा ग्रीन फील्ड एक्सप्रेस वे येणाऱ्या काळात महत्त्वाची भूमिका पार पाडणार आहे. कारण जर आपण संभाजीनगर पासून पुणे पर्यंतचा प्रवास पाहिला तर नगर मार्गे प्रवास करताना या रस्त्यावर प्रचंड प्रमाणामध्ये वाहनांची वर्दळ असते. त्यामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर या ठिकाणी होताना आपल्याला दिसून येते. तसेच हा नवीन महामार्ग तयार झाल्यानंतर पुणे शहराला थेट समृद्धी महामार्गाची कनेक्ट करता येणार आहे. त्यामुळे पुणे, नागपूर तसेच मुंबई या महत्त्वाच्या शहरांची कनेक्टिव्हिटी देखील तयार होणार आहे. पुणे- नगर- संभाजीनगर या महामार्गावर सहा ठिकाणी टोल असणार असून त्यामुळे उत्पन्न चांगले मिळेल व साधारणपणे शंभर कोटी रुपये दर महिन्याला या माध्यमातून उत्पन्न मिळेल. हा रस्ता तयार करण्याकरिता कर्ज काढून जास्तीचे भांडवल उभे करता येईल. कारण या रस्त्यावर वाहतूक खूप राहणार आहे असे देखील केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटले. या महामार्गामुळे नागपूर ते संभाजीनगर चार तासांमध्ये आणि संभाजीनगर वरून पुणे दोन तासात जाता येणार आहे. पुणे शहरापासून नगर मार्गे संभाजीनगर ला जाताना रस्त्यावर जी काही अतिक्रमण आहेत ते काढून आजूबाजूला सर्विस रोड बनवा तसेच नवीन बांधला जाणारा हा महामार्ग उत्तम बनवा. जुन्या रस्त्याशी यांना नव्या रस्त्याला जोड रस्ता ही द्या व रस्त्याच्या बाजूला बीड आणि नगर जिल्ह्याचे जे दुष्काळी भाग आहेत त्या ठिकाणी नवीन औद्योगिक वसाहती तयार करण्याच्या सूचना देखील केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्या. संभाजीनगर पासून पुण्यापर्यंत ग्रीनफिल्ड हायवे तयार होत असून संभाजीनगर ते नगर आणि नगर ते पुणे यादरम्यान वाहनांची संख्या प्रचंड प्रमाणात असते व वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे या नवीन ६ पदरी महामार्गाची आवश्यकता होती असे देखील त्यांनी म्हटले. त्यासोबतच नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्ग जेव्हा पूर्णपणे सुरू होईल तेव्हा पुणे शहराला समृद्धी महामार्गाशी कनेक्ट करणे शक्य होईल व ते आवश्यक देखील होते. या नवीन एक्सप्रेस वेमुळे ही कनेक्टिव्हिटी शक्य होणार आहे. त्यामुळे नागपूर आतून सहा ते सात तासात पुणे पोहोचणे शक्य होणार आहे. केंद्राच्या रस्ते परिवहन व महामार्ग विभाग व महाराष्ट्र सरकारचा सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या झालेल्या या सामंजस्य करारावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री हे उपस्थित होते.

## मतदार संघातील विकासासाठी भरघोस निधी - आ.मोनिका राजळे

**पाथर्डी । वृत्तसेवा**



कोरडगावच्या विकासकामासाठी नऊ वर्षात वीस कोटी रुपयाचा निधी दिला. परीसारातील रस्ते, पिण्याचे पाणी, जलसंधारणाची कामे, शाळाखोल्या, सभागृह, वीज यासाठीचा निधी मोठ्या प्रमाणात दिला आहे. असे मत आमदार मोनिकाताई राजळे यांनी व्यक्त केले. तालुक्यातील कोरडगाव, कोळसांगवी येथील विविध विकास कामाच्या शुभारंभ व लोकार्पण सोहळ्याच्या कार्यक्रमात आ. राजळे बोलत होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे हभप प्रविण महाराज व नवनाथ महाराज कोरडगावकर उपस्थित होते. यावेळी आभार देशमुख यांनी मानले. धामणगाव, खरवंडी, चुंभळी, मंचरवाडी, हंडाळवाडी, कोरडगाव व कोळसंगावी येथे विविध विकास कामांचे उद्धाटने व लोकार्पण गुरुवारी दिवसभर करण्यात आले. कोळसांगवी ग्रामपंचायतीने दुर्धर आजाराने पिडीत व्यक्ती व ज्या घरात मुलीच आहेत त्या कुटुंबाला आर्थिक मदत करणे, मुलींच्या नावाने ठेव ठेवणे अशा योजना सुरु करुन तालुक्यात वेगळा आदर्श निर्माण केला आहे. फुंदे व यांच्या कार्याचे कौतुक आमदार राजळे यांनी केले आहे. कोळसागंवी ग्रामपंचायतीचा आदर्श इतर गावांनी घ्यावा असे आवाहन देखील आ. राजळे यांनी केले.

### विद्यार्थी देणार नीट परीक्षा

मुंबई -वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता देशपातळीवर होणाऱ्या नीट-यूजी या परीक्षेकरिता २५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. ही आजवरची सर्वाधिक नोंदणी आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार देशपातळीवर सर्व वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नीट ही एकमेव परीक्षा होते. त्यामुळे या परीक्षेला सर्वांत जास्त विद्यार्थी बसतात. यंदा तर विद्यार्थी नोंदणीने आजवरचे सर्व विक्रम मोडले आहेत. शनिवार हा नीट-यूजीच्या नोंदणीसाठी शेवटचा दिवस होता. ''नॅशनल टेस्टिंग एजन्सी''द्वारे ५ मे रोजी ही परीक्षा होणार आहे. आतापर्यंत देशभरातून २५ लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. २०२३ च्या नोंदणीपेक्षा हा आकडा चार लाख २० हजारांनी वाढला आहे. विद्यार्थी अजूनही अर्ज भरत आहेत. तांत्रिक कारणांमुळे अनेकांचे अर्ज प्रलंबित राहिले आहेत. त्यामुळे नोंदणीला मुदतवाढ मिळावी, अशी मागणी होत आहे. होमिओपॅथी, प्रवेश परीक्षा होते आहे.

### महिलांनो अकाली मृत्यूचा धोका

मुंबई - वाढत्या वयासोबत आरोग्याच्या अनेक समस्याही वाढत जातात. महिलांचे आरोग्य आधीच गुंतागुंतीचे असते. त्यामुळे वाढत्या वयात त्यांना अधिक समस्यांना तोंड द्यावे लागते. ४० च्या वयानंतर तर महिलांना त्यांच्या आरोग्याची जास्त काळजी घ्यावी लागते. या काळात महिलांनी आपल्या आरोग्यासाठी काही गोष्टी करणं आवश्यक आहे. यामुळे अनेक जीवघेणे आजार टाळता येतील. यातीलच सर्वात घातक आजार म्हणजे कॅन्सर. जगभरातील महिलांसाठी कर्करोग हे एक मोठे आव्हान बनले आहे. काही प्रकारचे कर्करोग स्त्रियांना अधिक प्रभावित करतात. हे टाळण्यासाठी लसीकरण आणि तपासणी आवश्यक आहे. डॉक्टरांच्या मते, महिलांनी कॅन्सरपासून बचाव करण्याचे उपाय जाणून घेतले पाहिजेत, जेणेकरून हा घातक आजार टाळता येईल. मिनिमल ऍक्सेस स्मार्ट सर्जरी हॉस्पिटल नवी दिल्लीच्या ऑन्कोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. सचिन आंबेकर यांच्या मते, स्त्रियांमध्ये स्तनाचा कर्करोग हा सर्वात सामान्य आहे. स्तनाच्या कॅन्सरनंतर गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग होतो. हे दोन्ही कॅन्सर स्त्रियांना सर्वाधिक प्रभावित करतात.

### परिक्षा न देता नोकरी मिळणार

मुंबई - उत्तम शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्यानंतर नोकरीच्या संधीदेखील चांगल्या प्रकारच्या मिळाल्या पाहिजेत, अशी प्रत्येकाची इच्छा असते. सरकारी नोकरीची संधी मिळणं किंवा सरकारी नोकरीसाठी प्रयत्न करताना त्यात यश येणं ही यशाची खूप मोठी पायरी असते. असंच सरकारी नोकरीचं स्वप्न पाहणाऱ्यांसाठी ही आनंदाची बातमी आहे. लिमिटेडमध्ये नोकरीची (सरकारी नोकरी) संधी शोधत असलेल्या युवकांसाठी ही एक चांगली बातमी आहे. यासाठी एनएचपीसीनं प्रशिक्षणार्थी अभियंता (ट्रेनी इंजिनीअर्स)/ प्रशिक्षणार्थी अधिकारी (ट्रेनी ऑफिसर्स) पदांच्या रिक्त जागा भरण्यात येणार आहेत. ज्या इच्छुक उमेदवारांची या पदांसाठी अर्ज करण्यासाठी इच्छा असेल, अधिकृत वेबसाइटच्या माध्यमातून अर्ज करता येईल. या पदांसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

### थोरातांची कन्या निवडणुकीच्या रिंगणात?

पाथर्डी - काँग्रेसचे नेते थोरात यांच्या मुलीची सक्रिय राजकारणात एन्ट्री झाली आहे. यामुळे



चर्चांना उधाण आलं आहे. जयश्री थोरात यांच्यावरील नवी जबाबदारी दिल्याने चर्चांना उधाण झालं आहे. जयश्री थोरात यांची संगमनेर विधानसभा युवक अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे नगरच्या राजकारणात ट्विस्ट येणार का अशीही चर्चा रंगली आहे. बाळासाहेब थोरात यांच्या कन्येची सक्रिय राजकारणात एन्ट्री झाली आहे. जयश्री थोरात यांची संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. जयश्री थोरात या सामाजिक कार्यात सहभागी असणाऱ्या जयश्री थोरात यांनी आता थेट सक्रिय राजकारणात प्रवेश केला आहे. जयश्री थोरात यांच्यावर पहिल्यांदाच पक्ष संघटनेची जबाबदारी देण्यात आली आहे.

### पुण्यातील शास्त्रज्ञांचा नावलौकिक

पुणे - तब्बल नऊ अब्ज प्रकाशवर्षे अंतरावर असणार्या दहा नव्या आकाशगंगा शोधून तेथून निघणारे अतिनील फोटॉन किरणांचे निरीक्षण पुण्यातील आयुकाच्या शास्त्रज्ञांनी जगात प्रथमच यशस्वी केले आहे. डॉ. सूरज धीवर या शास्त्रज्ञांनी हे संशोधन केले आहे. भारताने २०१६ मध्ये आकाशगंगेचा शोध घेण्यासाठी ॲस्ट्रोसॅट नावाचा उपग्रह अवकाशात पाठवला होता. त्यावर आयुकातील शास्त्रज्ञांची टीम काम करीत आहे. डॉ. सूरज धीवर यांनी स्थानिक आकाशगंगेपासून आठ ते नऊ अब्ज प्रकाशवर्षे लांब असणार्या नव्या आकाशगंगा शोधून काढल्या. त्यातून निघणार्या अतिनील किरणे टिपण्यात त्यांना यश आले आहे. ॲस्ट्रोसॅट उपग्रहात यूव्हीआयटी ही अस्सल भारतीय दुर्बीण आहे. त्याद्वारे या शास्त्रज्ञांनी इलेक्ट्रॉन आणि फोटॉनचाही अभ्यास केला. पहिल्या एक अब्ज वर्षांच्या आत आपले विश्व री-आयोनायझेशन या प्रक्रियेतून तयार झाले. या प्रक्रियेत हायड्रोजनचे अणू हे प्रोटॉन आणि इलेक्ट्रॉनमध्ये विलग होतात. जेव्हा त्यावर उच्च ऊर्जेच्या अतिनील किरणोत्सर्ग होतो. या प्रकाशाला लायमन कॉन्टिन्युम म्हणून ओळखले जाते. या प्रकाशाची वारंवारता ६०० आर्मस्ट्राँग इतकी आहे. त्यांना टिपणे अवघड काम असते कारण त्या पसार्यात लुप्त होऊन जातात त्यामुळे हे संशोधन महत्त्वाचे आहे.

## भव्य कुस्त्यांच्या स्पर्धा संपन्न



बीड - तपस्वी ईश्वरभारती महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन भूमीत भव्य कुस्त्यांची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.आखाडा पुजन बेलेश्वर संस्थान मठाधिपती महादेव भारती महाराज आणि शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या शुभहस्ते करण्यात आले. पुणे, नगर, बीड जिल्ह्यातील पहेलवान कुस्तीत सहभागी झाले होते. कुस्त्यांची स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. शेवटची मानाची कुस्ती नेकनुरचा पहेलवान शेख आसेफ आणि पाटोदा येथील पहेलवान कृष्णा पवार यांच्यात बरोबरीत सुटली. कुस्त्यांची स्पर्धा पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कुस्ती प्रेमींनी गर्दी केली होती. कुस्त्यांच्या कार्यक्रमाचे आयोजनासाठी बेलगावचे सरपंच अशोक जाधव, उपसरपंच सुखदेव कोळपे तसेच मधुकर शेळके, कल्याण शेळके, नवनाथ कोळपे, बाबासाहेब शेळके, कोळपे आदिंनी परीश्रम घेतले.

## स्फोटात उडाली तरुणाची बोटे

बीड - घरासमोर सापडलेल्या डिटोनेटरला मोबाईल चार्जर समजून पोलीस भरतीचा अभ्यास करणाऱ्या तरुणाने ते स्टॅबलायजरला जोडले असता मोठा स्फोट होऊन त्यात तरुणाच्या हाताच्या अंगठ्यासह तीन बोटे तुटून तो गंभीर जखमी झाला. हि खळबळजनक घटना बीड तालुक्यातील कचरवाडी येथे शुक्रवारी (दि.०८) रात्री घडली. वणवे (वय २५, रा. कचरवाडी) असे त्या जखमी तरुणाचे नाव आहे. गावालगत असलेल्या गोठ्यामध्ये थांबून पोलीस भरतीचा अभ्यास करत असतो. मंगवारी (दि.०५) त्याच्या आईला घरासमोर चार्जर सदृश्य वस्तू सापडली होती. वास्तवात चार्जर समजून कृष्णाची आई घरात घेऊन आलेली ती वस्तू डिटोनेटर होती. घरात इतर चार्जर असल्याने दोन दिवस त्याकडे कोणाचे लक्ष गेले नाही. मात्र, शुक्रवारी ते डिटोनेटर घेऊन रात्री कृष्णा गोठ्यात अभ्यासासाठी गेला. रात्री १० वाजताच्या सुमारास चार्जर समजून ते डिटोनेटर स्टॅबलायजरला जोडताच मोठा स्फोट झाला. या स्फोटात त्याच्या हाताचा अंगठा आणि दोन बोटे तुटून उडाली आणि हाताला मोठी दुखापत झाली. जखमी कृष्णाला ग्रामस्थांनी बीडच्या एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपास सहा. पोलीस निरिक्षक चंद्रकांत गोसावी करत आहेत.

## खा.डॉ. गोपछडे यांचा सत्कार संपन्न

अंबाजोगाई - स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाला वैद्यकीय क्षेत्रात राज्याच्या



उच्च स्तरावर नेण्याचा प्रयत्न करणार असे मत या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा राज्यसभेचे नवनिर्वाचित खा. डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केले. राज्यसभेच्या सदस्य पदी नियुक्ती झाल्यानंतर खा. डॉ. अजित गोपछडे यांनी प्रथमच अंबाजोगाई शहरास भेट दिली. यावेळी सर्वप्रथम आ. नमिता मुंदडा यांच्या निवासस्थानी मतदारसंघातील सर्व प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. या नंतर खा. डॉ. अजित गोपछडे यांनी स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयास भेट दिली. यावेळी कॉलेज कॉन्सिलच्या हॉलमध्ये त्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने अधिष्ठाता यांनी सत्कार केला. यानंतर या वैद्यकीय महाविद्यालयात त्यांच्यासोबतच पदव्युत्तर शिक्षण पुर्ण केलेले व मार्ड संघटनेचे हिरहिरीने काम करणारे त्यांचे सहकारी मित्र इएनटी चे विभागप्रमुख डॉ. प्रशांत देशपांडे व इतर सहका-यांनी, पदव्युत्तर विद्यार्थी संघटना, युजी विद्यार्थी संघटना, चतुर्थ कर्मचारी संघटना, परिचारिका संघटना, शहरातील मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन, अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.




# मतदार संघातील रस्ते दर्जेदार -आ.लक्ष्मणअण्णा

**गेवराई । प्रतिनिधी**

महायुतीचे सरकार महाराष्ट्रात आले तेव्हापासून मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून माझ्या मतदारसंघातील रस्ते व रस्त्यावरील पुल, बंधारे, अगंनवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्र, बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात विकास निधी उपलब्ध करून घेऊन मतदारसंघातील प्रत्येक रस्ता दर्जेदार होईल यांची काळजी घेण्यात येत आहे तरी माझ्या कार्यकाळात झालेला रस्ता पाच वर्ष टिकवण्याची जबाबदारी माझी राहील असे आ.लक्ष्मण




आण्णा पवार यानी यावेळी बोलताना सांगितले ते म्हणाले की बागपिंपळगाव फाटा ते टाकरवण जाणारा दर्जेदार झाला आहे त्यामुळे आता तलवडा येथुन गेवराई जाण्यासाठी काही मिनिट लागतात तसेच त्वरीता मंदिरात भाविकांसाठी दर्जेदार रस्ता केला आहे लोकप्रतिनिधी म्हणून आपण मतदारसंघाच्या विकासासाठी कटिबद्ध आसल्याचे आ.लक्ष्मण आण्णा पवार यावेळी म्हणाले आज दि.९ शनिवार रोजी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत विधानसभा मतदारसंघातील गेवराई तालुक्यातील १२ कोटी रू. तलवडा ते भोगलगाव,व भोगलगाव ते बोरगावथडी डांबरीकरण रस्ता कामाचा आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या हास्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी ॲड सुरेश हात्ते, शाम कुंड, उध्दव मडके, आबासाहेब सुर्वे, रमेश कानाडे, विठ्ठल हात्ते, विजय लाटे,इश्वर पवार, ॲड सुरेश पवार, सचिन वीर,ॲड साखरे, सचिन वावरे,महादेव खटके, अभिजीत मरकड, भारत खटके,संतोष खाडे,आब्दुलभाई, मस्के, गायके,प्रल्हाद येळापुरे आदी उपस्थित होते.

# कॉपीमुक्त परीक्षा फक्त घोषणा -ॲड.अजित देशमूख

**बीड । प्रतिनिधी**

गुणवत्ता ही फक्त मार्कांवर अवलंबून नाही. तर विद्यार्थ्यांचे मेंदूमध्ये अभ्यास कशा पद्धतीने रुजला, हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे परीक्षेतील कॉफी मुक्ती आवश्यक होती. मात्र अखेर कॉपीमुक्ती झालीच नाही. परीक्षा केंद्रावर जाऊन एखादा फोटो काढून भेट दिल्याचे दाखवून कॉपीमुक्त परीक्षा होत नसतात. हे आम्ही काही वर्षांपूर्वी दाखवून दिले होते. त्यानंतर कॉपीमुक्त परीक्षा कधी झाल्याच नाहीत, अशी खंत जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी



व्यक्त केली आहे. नुकत्याच संपलेल्या बारावीच्या आणि चालू असलेल्या दहावीच्या परीक्षेमध्ये कॉपीचे पेव फुटलेले आहे. मात्र याकडे जिल्हा प्रशासन अजिबात लक्ष देत नाही. कोणत्या तरी अधिकाऱ्यांने कुठे तरी जाऊन परीक्षा हॉलमधील फोटो टाकला आणि तो जनते पर्यंत पोहोचवला, तर एवढ्याने कॉपी थांबणार नाही. कॉफीमुक्त परीक्षेसाठी अहोरात्र प्रयत्न करावे लागतात. ते आम्ही मागील काही वर्षांपूर्वी केले होते. ज्याप्रमाणे राजकारण सडत चालले आहे, त्याप्रमाणे शिक्षण प्रणाली सडत ठेवण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून होत आहे का ? हा प्रश्न देखील यावेळी उपस्थित होत आहे. विद्यार्थ्यांना वर्षभर अभ्यास करायचा, असे सांगून शेवटच्या टप्प्यात पालक देखील कॉपी पुरवत असतील तर त्यापेक्षा वेगळी खंत कोणती आहे, असे देखील चित्र निर्माण होत आहे. गुणवत्ता विकास करण्याचा ध्यास आता संपला आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि पालक यांची देखील फरफट झाली आहे. कॉपीमुक्त परीक्षा ही फक्त घोषणा ठरत आहे. ज्या अधिकाऱ्याला परीक्षेत कॉपी होत नाही, असे म्हणायचे आहे, त्यांनी आजच त्याची भूमिका स्पष्ट केली तर उद्या कुठे आणि कशी कॉपी होते, हे आपण त्या अधिकाऱ्याला दाखवून देऊ, असेही देशमुख यांनी म्हटले आहे.

## श्री क्षेत्र चाकरवाडी येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**बीड प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र चाकरवाडीमध्ये तीन



दिवशीय महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार यांचे कीर्तन होणार आहेत. या सर्व होणाऱ्या कार्यक्रमाचा भावी भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन संस्थांचे ह. भ. प महादेव महाराज यांनी केले आहे. विसाव्या शतकातील महान संत विभूती संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांचा पवित्र पावन भूमीमध्ये सुरुवात झाली आहे. प्रमुख मार्गदर्शक तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य श्री ह.भ.प महादेव महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली होणारे सर्व कार्यक्रम पार पडतील. ह.भ.प प्रशांत महाराज क्षीरसागर श्री क्षेत्र येळंब घाट यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकारांची हरिकीर्तन होणार आहेत. या कार्यक्रमास वारकरी संप्रदायातील मान्यवर महाराज मंडळी सह गायक वादकांची उपस्थिती राहील. भावीक भक्तांनी हरिनाम श्रवणाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. गाथा भजन हरिपाठ नेतृत्व हे श्री नादब्रह्म वारकरी शिक्षण संस्था ताडबोरगाव जिल्हा परभणी यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. कार्यक्रम हा सद्गुरू संत श्री ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिर माऊली धाम श्री क्षेत्र चाकरवाडी या ठिकाणी संपन्न होणार आहे. तरी होणाऱ्या सर्व कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन संस्थांचे ह.भ.प महादेव महाराज चाकरवाडीकर तसेच चाकरवाडी ग्रामस्थ यांनी केले आहे.

## सावित्रीबाई फुले यांना अभिवादन



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

क्रांतीज्योती माता सावित्रीमाई फुले यांच्यामुळेच ज्योतिबा फुले यांना महात्मा ज्योतिबा फुले बनता आले अशी भावना क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ. सुनीता राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली. त्या सावित्रीमाई फुले यांच्या पुण्यस्मरन निमित्ताने पतसंस्थेत त्यांना अभिवादन प्रसंगी बोलत होत्या. याप्रसंगी पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ. सुनीता राजकिशोर मोदी यांच्यासह संचालिका खडकभावी शोभा बाबू,रापतवार सविता विजय, चोकडा जमुना जयप्रकाश, मस्के अंजली विष्णुपंत,मोहिते सायली सुहास,खंडाळे सुरेखा बाबुराव, यांच्यासह जया मुडेगावकर, तसेच प्रेमा बरदापुरकर या उपस्थित होत्या. यावेळी प्रथम सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. उपस्थित सर्व संचालिकांनी पुष्प अर्पण करून सवित्रीमाईंना अभिवादन केले. अभिवादन प्रसंगी बोलताना पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ. सुनीता राजकिशोर मोदी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्याकाळी महिला , मुली तथा बहुजन समाजातील मुले व पुरुषांना देखील शिक्षण घेण्यासाठी बंदी घालण्यात आली होती. या बंदीला झुगारून समाजातील मुली महिलांना तसेच पुरुषांना शिक्षणासाठी प्रेरित करण्यासाठी माता सावित्रीमाई सरसावून पुढे आल्या. या कामात त्यांना अनेक अडचणी व संकटांचा सामना करावा लागला.

# भोसले गँगचा म्होरक्या अखेर पोलिसांच्या ताब्यात

**बीड । प्रतिनिधी**

बीड पोलिसांच्या डोळ्यात चटणी टाकणाऱ्या सचिन ऊर्फ सच्या ईश्वऱ्या भोसले (वय २७, रा. नागझरी, ता. गेवराई) याला बेड्या ठोकल्या होत्या. तो भोसले गँगचा म्होरक्या आहे. त्याची चौकशी केली असता तो तपासात कसलेही सहकार्य करत नाही. एवढेच नव्हे तर खोटी माहिती सांगून दिशाभूल करत आहेत. त्याने अजय देवगण भाऊ, तर माधुरी दीक्षित बहीण



असल्याचे पोलिसांना सांगितले आहे. त्याला काहीही विचारले की तो अभिनेता, अभिनेत्री, राजकीय नेत्यांची नावे घेऊन ते नातेवाईक असल्याचे सांगत आहे. ईश्वऱ्या भोसले हा मूळचा आष्टी तालुक्यातील वाहिरा येथील रहिवासी; परंतु नंतर तो अहमदनगर येथे स्थलांतरित झाला. तो कुख्यात गुन्हेगार आहे. त्याला चार बायका आणि तब्बल २७ मुले आहेत. त्यातीलच एक सच्या आहे. ईश्वऱ्या सध्या मयत असून, त्याची मुले राज्यात धुमाकूळ घालत आहेत. काही दिवसांपूर्वीच सच्याचा भाऊ आटल्या याला पोलिसांनी बेड्या ठोकल्या होत्या.

# श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे मेंगडे महाराज यांची कीर्तन संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या



श्रीक्षेत्र चाकरवाडीमध्ये तीन दिवसीय किर्तन महोत्सव आहे.प्रमुख मार्गदर्शक तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य श्री ह.भ. प महादेव महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली होणारे सर्व कार्यक्रम पार पडतील. या महोत्सवामध्ये विसाव्या शतकातील महान संत विभूती सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडीकर यांच्या पवित्र पावन भूमीमध्ये पहिल्या दिवशी वारकरी संप्रदायातील कीर्तन परंपरेतील एक थोर विभूती मठाधिपती महंत श्री ह भ प मेंगडे महाराज श्री बंकटस्वामी महाराज मठ संस्थान श्री क्षेत्र निनगुर यांनी जगद्गुरु तुकोबाराय यांच्या
तुम्ही विश्वनाथ । दीनरंक मी अनाथ ।।१।। कृपा कराल ते थोडी । पायां पडिलों बराडी ।।ध्रु.।। काय उणें तुम्हांपाशीं। मी तों अल्प चि संतोषी ।।२।।
तुका म्हणे देवा । कांहीं भातुकें पाठवा या अभंगावर चिंतन करून भाविक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. देवा तुम्ही विश्वनाथ आहात आणि मी तर दिन रंक अनाथ आहे. हे विश्वनाथ मी तुमचा भक्त आहे तुम्ही थोडी का होईना पण माझ्यावर दया करा. देवा तुमच्याजवळ भक्तांना देण्यासाठी काय उणे आहे आणि मी तर अल्प संतोषी आहे. तुकाराम महाराज म्हणतात हे देवा मला तुम्ही काहीतरी प्रेमरूपी भातुके म्हणजे खाऊ पाठवा. अशाप्रकारे महाराजांनी आपल्या अभंगातून भाविकांना संदेश दिला. अभंगावर चिंतन करून हरिहराचे दर्शन करून नाथाचे प्रकार कोणते आहे ? कृपेचे प्रकार किती ? अति महत्त्वाकांक्षामुळे भस्मासुराचा भस्म कसा झाला... महाशिवरात्री व शिव-पर्वामुळे चंड भिल्लाचा उद्धार कसा झाला. यावेळी मृदुंगाचार्य नादब्रह्म वारकरी शिक्षण संस्थेचे राम महाराज काजळे, अमोल महाराज पवार चाकरवाडीकर, गायनाचार्य बिबीशन महाराज कोकाटे, गायनाचार्य काळे महाराज, गायनाचार्य महादेव महाराज रोडे, त्रिंबक महाराज शेळके, दिनेश महाराज काळे, राम महाराज गायकवाड, पांडुरंग महाराज शिंदे, श्रीनिवास महाराज खोसे, तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्त नादब्रम्ह वारकरी शिक्षण संस्थेचे विदयार्थी उपस्थीत होते.

# महिलांचे सक्षमीकरण होण्याची काळाची गरज -प्राजक्ताताई धस

**आष्टी । प्रतिनिधी**

महिलांनी चूल आणि मूल यापुरते मर्यादित न राहता मुलांच्या शिक्षणाकडे तसेच कौटुंबिक आर्थिक परिस्थितीच्या प्रगती करण्यासाठी महिलांनी पुरुषाच्या बरोबर आपला संसाराचा गाडा अधिक जोमाने न्यायला पाहिजेत. तसेच आपल्या मुलामुलींच्या शिक्षणासह सोबत संस्काराकडे लक्ष दिले पाहिजे. आज महिला सर्वच क्षेत्रात प्रगती करत असून देश महासत्ता होण्यासाठी महिलांचा सहभाग महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागातील महिलांनी व्यवसायासह अत्याधुनिक शेती व नोकरी आदी क्षेत्रात आपले स्थान अधिक मजबूत करणे गरजेचे आहे आणि महिलांचे सक्षमीकरण व सशक्तीकरण काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महानंदा दूध संघ मुंबईच्या संचालिका प्राजक्ताताई सुरेश धस यांनी आष्टी येथे केले. आष्टी येथील पंचायत समितीच्या सभागृहात आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने शनिवार दि ९ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त २६ कर्तबगार महिलांचा राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर महिला आयोगाच्या सदस्या ड प्रज्ञाताई खोसरे, उपविभागीय अधिकारी प्रमोद कुदळे, पोलिस उपअधीक्षक शुभदा घोगरे,



गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, वैद्यकीय अधीक्षक डॉ राहुल टेकाडे, एकात्मिक बालविकास अधिकारी अंजली वाघमारे, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या कार्याध्यक्ष शालीणी परदेशी, उद्योजक अजय कापरे, ॲड. रिजवान शेख आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना प्राजक्ता धस म्हणाल्या की, युवा पत्रकार संघ नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असून त्यांनी तळागाळातील महिलांचा सन्मान करून एक स्तूत्य उपक्रम राबवत आहेत. यावेळी बोलताना महिला आयोगाच्या सदस्या ड प्रज्ञा खोसरे म्हणाल्या की, बालविवाह रोखण्यासाठी पालकांचा सहभाग महत्त्वाचा आहे त्यासाठी बालविवाह प्रतिबंधक कायद्यांची माहिती सर्व पालकांपर्यत पोहचून याबाबत जनजागृती करणे महत्त्वाचे आहे त्यामुळे बालविवाह रोखले जातील. आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना पुरस्कार देऊन सन्मान केला. महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे महिला अत्यंत धाडसी कामे करतात.पुरूषाच्या बरोबरीने आज महिला काम करत आहेत.तळागाळातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा पुरस्कार देऊन सन्मान युवा पत्रकार संघाने केला त्यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पोलीस उपअधीक्षक शुभदा घोगरे, सुधाकर यादव, अंजली वाघमारे,अजय कापरे आदी मान्यवरांनी आपले विचार मांडले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष निसार शेख, सचिव जावेद पठाण, कार्याध्यक्ष अक्षय विधाते, संघटक अतुल जवणे, कोषाध्यक्ष आण्णासाहेब साबळे, गहिनीनाथ पाचबैल, प्रेम पवळ,समीर शेख, संतोष नागरगोजे, संतोष तांगडे, किशोर निकाळजे, दादा पवळ,राजु मस्के, संतोष दाणी,बा म पवार, राजेंद्र लाड, शहानवाज पठाण, अमोल जगताप आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निसार शेख यांनी केले तर या कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन डॉ अनिता चव्हाण यांनी केले व आभार अविनाश कदम यांनी मानले. जनाबाई आनंदराव बनसोडे, शुभदा घोगरे/चव्हाण, विजया गंगाधर घुले, विद्या संतोष चव्हाण,सीमा दिगंबर वालेवाडीकर/ कांबळे, नंदाताई पांडुळे, डॉ. प्रियंका सिंघन, श्रीमती संजना रावसाहेब गाढवे, प्रा. डॉ. काझी तनवीर बेगम हाफिजोदिन, सुनीता भोपळे, सोनल शिवलाल गायकवाड, ड. सय्यद अतीया ताहेर, शोभा पगारे, दिपाली हरिभाऊ पोकळे, खान यास्मिन, सुनिता थोरवे, उषा जगदाळे, म्हसोबा महिला शेतकरी गट पारोडी, निशा आदक, सुजाता देवराव जाधव, वंदना नवनाथ खिलारे, पत्रकार गीतांजली लव्हाळे, तनिष्का महिला बचत गट देवळाली,रोहिणी रमाकांत पोतदार,अमूल्या यादव,साईश्री दातीर या विविध क्षेत्रातील महिलांना शाल, वृक्ष, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व फेटा बांधून 'नारी सन्मान २०२४' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. युवा पत्रकार संघाचे कार्य कौतुकास्पद असून त्यांनी आष्टी तालुक्यात सामाजिक शैक्षणिक उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबवले. गरीब अनाथ विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करून त्यांचे जीवन आनंदमय केले. आज प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडीवर आहे. अनेक महिला ह्या उत्कृष्ट कार्य करून ही त्यांची दखल घेतली गेली नव्हती. आज युवा पत्रकार संघाने कर्तुत्वान महिलांचा खऱ्या अर्थाने सन्मान करून त्यांना न्याय दिला. त्यामुळे युवा पत्रकार संघाचा आदर्श इतरांनी घ्यावा असे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी प्रमोद कुदळे यांनी केले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com